कै. एस. आर. उर्फ बाबा चिटणीस स्मृती
अभिवाद न्यायालय स्पर्धा, २०१८
समस्या क्र. २ ( मराठी)

रेमण्ड ह्यांच्याकडून लोकरीच्या शाली आणि मफालर्स असलेले ५ गठ्ठे वेगन क्र. C. R. ४२५ मधून जळगाव ते मुंबई, मार्गे- कल्याण पाठवण्यात आले होते.

दिनांक १४ फेबृवारी, २०१४ रोजी सकाळी १० च्या सुमारास कल्याण स्थानकाजवळ सदरहु कुलूप तोडण्यात आले असून आतील गठ्ठे गहाळ असल्याचे आढळले. त्यांपैकी एक गठ्ठा कल्याण स्थानकाबाहेर आढळला.

दिनांक १६ फेबृवारी, २०१४ रोजी एका श्री. गोपीनाथ यांच्या घराची झडती घेतली असता, त्यांच्या घरातून फाडलेले बिल्ले (लेबल्स) जप्त करण्यात आले. सदर दिवशी पोलिसांनी एक श्री. राजेंद्रनाथ व एक श्री बिरेन्द्रनाथ यांना श्री. गोपीनाथ यांच्या बंद असलेल्या घरातून बाहेर पडताना पहिले. सादरहू दोन्ही इसमांना पोलीस ठाण्यात नेले असता श्री. राजेंद्र ह्यांनी चोरीची मालमत्ता पोलिसांच्या ताब्यात देण्याची कबुली दिली.

श्री, राजेंद्र यांनी दिलेल्या माहितीनुसार दिनांक. १८ फेबृवारी, २०१४ रोजी पोलिसांनी श्री. गोपीनाथ यांच्या घरतून निळ्या रंगाच्या लोकरी शाली, माफलर्स तासेस घर-फोडीची अवजारे जप्त केली.

तपासाच्या परिणामी, सदर तिघा इसमांना Magistrate (दंडाधिकारी) न्यायालयासमोर पेश करण्यात आले. श्री. राजेंद्रनाथ यांचेवर भा. द. वि. (भारतीय दंड विधान) कलम १२० (ब), कलम ३७९ व कलम ४१४ अंतर्गत; श्री. गोपीनाथ यांचेविरुद्ध भा. द. वि. कलम १२० सोबत कलम ४१४ अंतर्गत आणि श्री बिरेन्द्रनाथ यांचेविरुद्ध भा.द. वि. कलम ४१४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रेमण्ड चे विक्रेते तसेच वादी साक्षीदार क्र. १, श्री कुंझ्रू, यांच्या जबाबी हे सिद्ध झाले कि चोरीला गेलेल्या शाली ह्या रेमण्ड द्वारा उत्पादित होत्या, परंतू वादी साक्षीदार क्र. १ यांनी सदर केलेल्या चलानामध्ये लाल रंगाच्या सहलीचा उल्लेख आढळून येत नाही.

मुद्द्यांचा अहवाल

अ. जप्त करण्यात आलेली मालमत्ता श्री राजेंद्र नाथ ह्यांच्या मालकीची नसूनही चोरीची असल्याचे सिद्ध होऊ शकते काय?

ब. गुन्हेगारी कट सिद्ध होऊ शकतो काय?

क. भा. द. वि. कलम ४१४ अंतर्गत गुन्हा करण्यात आला आहे काय?